# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र. १५४** **दिनांक ११/०६/२०२१**

## वेश्या व्यवसायावर कारवाई करुन ०३ पिडित मुलींची सुटका करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर पथक यांना यश

महिला नामे वैदेही उर्फ विभूती अशोककुमार राजगोर हि पुरुष गिऱ्हाईकांकडुन पैसे स्विकारुन वेश्यागमनाकरीता नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान, भाईंदर (प.) या ठिकाणी वेश्यागमनाकरीता पुरुष गिऱ्हाईकांस मुली पुरविणार असल्याची खात्रीशिर गुप्त बातमी मिळाल्याने वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. एस. एस. पाटील यांनी पथकासह नमुद ठिकाणी दि. १०.०६.२०२१ रोजी बोगस गिऱ्हाईक व पंच यांना पाठवुन सत्यता पडताळुन छापा टाकला असता महिला वेश्यादलाल वैदेही उर्फ विभूती राजगोर, वय-३० वर्षे ही वेश्यागमनासाठी ग्राहकांकडुन पैसे स्वीकारुन त्या मोबद्दल्यात मुली पुरवित असतांना मिळुन आल्याने तिचेकडून वेश्यगमनाकरीता स्वीकारलेल्या रक्कमेसह ताब्यात घेवुन ०३ मुलींची सुटका करण्यात आली. सदर बाबत महिला वेश्यादलाल व तिची साथीदार रेखा लांबा उर्फ दिदी यांच्या विरुध्द भाईंदर पोलीस ठाणे येथे पो.हवा./१९८७ विजय ढेमरे यांनी सरकार तर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन भाईंदर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I २३९/२०२१ भा.द.वि.सं. कलम ३७०, ३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४, ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महिला वेश्यादलाल वैदेही उर्फ विभूती अशोककुमार राजगोर, वय-२८ वर्षे, रा. पी/६, गायत्री सोसायटी, बाब सिताराम मंदिराजवळ, गावदेवी कम्पाऊंड, मिरा गावठाण, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे मुळ रा. अहमदाबाद, गुजरात हि अल्पवयीन असतांना तिची सन-२००६ मध्ये बोरीवली पोलीसांनी वेश्यावसायातुन सुटका केल्याचे व सदर बाबत तिची आई १) सौ. रुपलबेंन दिनेशकुमार जोशी, मामा २) मकेश गोवर्धनदास ठक्कर, आजोबा ३) गोवर्धनदास जयराम ठक्कर व आजी ४) सौ. सुशिला गोवर्धनदास ठक्कर यांच्या विरुध्द बोरवली पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.क्र.५०/२००६, भादंविस कलम ३६६ (अ), ३७६,३२८,३४, सह पिटा ॲक्ट कलम ४, ५, ९ प्रमाणे गुन्हा दाखल असल्याचे प्रथामिक तपासात निष्पन्न झाले आहे.

सदरची कारवाई डॉ. श्री महेश पाटील, पोलीस उप.आयुक्त (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर विभागाचे व.पो.नि. श्री. संपतराव पाटील, पो.हवा./१९८७ विजय ढेमरे, पो.शि./३६६० केशव शिंदे, म.पो.ना./२८४५ कमल चव्हाण, चालक पोना/२६३८ गावडे यांनी केली आहे.

------oooooo------